Lokmat

Printed from Lokmat epaper, Published on Thursday, February 25, 2016, Lokmat Hello Nashik City Page No. 6

A A A << Back to Headlines Next >>

# उद्योजकांना मार्गदर्शन

सिडको :

नाशिकमधील उद्योजकांना जर स्पर्धा करावयाची असेल तर वीजदर कमी असणे गरजेचे असून उद्योगांना एलबीटी लावण्यात आल्याने उद्योगांचा विस्तार होत नसल्याचे कॅप्रिहेंन्स इंडिया लिमिटेडचे कार्यकारी संचालक रॉबिन बॅनर्जी यांनी सांगितले. महाराष्ट्र इंडस्ट्रियल अँण्ड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट असोसिएशनच्या व एस.एम.ई. चेंबर ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित उद्योजकांना मार्गदर्शन करताना बॅनर्जी बोलत होते. शासनाने उद्योगधंदे वाढण्यासाठी व्यावसायिकांना येणाऱ्या अडचणी त्वरित सोडविणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने शासनाने उद्योजकांसाठी एक खिडकी योजना लागू क ेली पाहिजे. आज उद्योग सुरू करावयाचा असल्यास शासनाकडील अटी शर्तींमुळेच उद्योजकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पन्नास कोटींच्या वर उत्पन्न असणाऱ्या उद्योजकांना एलबीटी भरणे बंधनकारक असल्यामुळे उद्योजकही त्यांचा व्यवसाय हा पन्नास कोटींच्या आतच दाखविण्याचा प्रयत्न करतो, यामुळे उद्योजकांचा विस्तार होत नाही. उद्योग करताना पारदर्शकता आली पाहिजे.

उद्योजकांना विविध कर,परवानग्या यात वेळ तर जातोच परंतु अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, म्हणून शासनाने यासाठी पुढाकार घेऊन एक खिडकी योजना सुरू करणे गरजेचे असल्याचेही बॅनर्जी यांनी सांगितले. तसेच उद्योजकांनीही स्वत:चा व्यवसाय करताना मागणी व पुरवठा याचा ताळमेळ ठेवल्यास व्यवसाय वाढण्यास मदत होऊ शकते. उद्योजकांनी आपल्या व्यवसायातील नफा-तोटा समजून घेतला पाहिजे व स्वत:चा व्यवसाय कसा चालला आहे याची माहिती ठेवणे गरजेचे आहे. तसेच उद्योजकांनी त्यांच्या व्यवसायाची पडताळणी दरवर्षी केल्यास त्यांना सोयीस्कर होऊ शकते असेही शेवटी बॅनर्जी यांनी सांगितले.

सहायक विक्रीकर आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी सांगितले की, उद्योजकांनी आपला कर भरताना कर सल्लागारांवर अवलंबून न राहता या संदर्भात प्रत्यक्ष अधिकाऱ्यांशी संवाद साधला तर उद्योजकांच्या अनेक समस्या दूर होतील.

तसेच या विभागाच्या कामकाजात मोठ्या प्रमाणात पारदर्शकता आली आहे. विक्रीकर परतावा, सी-फॉर्म तसेच हे आयकराचा परतावा ऑनलाइन झाले आहेत. परंतु उद्योजकांपर्यंत यातील अनेक योजना पोहोचत नाही यामुळे उद्योजकांना अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो. यासाठी उद्योजकांनी त्यांच्या कामकाजासाठी कोणावर अवलंबून न राहता थेट अधिकाऱ्यांशी संवाद साधावा.

तसेच मोठ्या उद्योगांवर अवलंबून राहणाऱ्या छोट्या उद्योजकांची देणी ही वेळेवर मिळत नसल्याने छोटे उद्योजक हे त्यांचा आयकर नियमित भरत नाही. परंतु छोट्या व्यावसायिकांनी असे न करता त्यांचा आयकर नियमित भरला पाहिजे, असेही कुलकर्णी यांनी सांगितले. प्रास्ताविक चंद्रकांत साळुंखे यांनी, तर आभार एस. महेशकुमार यांनी मानले.

---

<< Back to Headlines Next >> A A A